UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक।।

पुरवणी अंक १३ – डिसेंबर २०२२ (त्रैमासिक)

- शके १९४४
- वर्ष : ९०
- पुरवणी अंक : १३

संपादक मंडळ

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

* प्रकाशक *

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

कार्यालयीन वेळ

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

४३. आर्थिक वृद्धी आणि शाश्वत आर्थिक विकास
- मोरेश्वर भिकाजी शेन्डे ---------- २१५

४४. ग्रामीण जीवन कवी मनातील शेतकरी
- डॉ. संजय जनार्दन आगलावे ---------- २१७

४५. नागपुरी बोली : एक भाषाशास्त्रीय अभ्यास
- डॉ. वैजयंती पेशवे ---------- २२०

४६. भटक्या–विमुक्त जाती–जमातींची जातपंचायत व स्त्रिया : एक अभ्यास
- सौ. अनुराधा प्रशांत पवार (गोरे) ---------- २२४

४७. भारतीय शेती आणि शेतकऱ्यांची आजची स्थीती एक विश्लेषनात्मक अध्ययन
- प्रा. डॉ. प्रशांत रा. देशमुख ---------- २२८

४८. सोलापूर जिल्ह्याच्या शेती विकासात 'मागेल त्याला शेततळे' योजनेचे योगदान
- संतोष अर्जुन शिंदे, डॉ. सत्यम काकासाहेब सानप ---------- २३२

४९. सर्वसमावेशक वृद्धीची आवश्यकता
- सहा. प्रा. कैलास सत्यवान शेलार, प्रा. (डॉ.) आदिनाथ मोरे ---------- २३६

५०. औद्योगिक क्षेत्रातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास – विशेष संदर्भ अहमदनगर जिल्हा
- डॉ. विशाल भाऊसाहेब पावसे, वैशाली दिनकर कानवडे ---------- २४०

५१. महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांच्या समस्या
- डॉ. शरद बाबुराव सोनवणे ---------- २४४

५२. बोली भाषेचे संवर्धन : काळाची गरज
- डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे ---------- २४८

५३. भारतातील नैसर्गिक आपत्ती : महापूर
- डॉ.अनिल विजय शितोळे, महेशकुमार विष्णू साळुंखे ---------- २५०

५४. आधुनिक कालखंडातील इतिहास लेखनाची वैशिष्ट्ये
- प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र ---------- २५६

५५. कृषी योजनांची शेतकऱ्यांच्या विकासात भुमिका
- डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार ---------- २५८

५६. कृषी विपणन आणि कृषी अर्थशास्त्राचे देशाच्या विकासातील योगदान
- डॉ मृणाल रविकांत वलीवकर ---------- २६२

५७. राजकारणातील महिला आरक्षण आणि महाराष्ट्रातील महिलांचा राजकारणातील प्रत्यक्ष सहभाग
- प्रा.पेंडभाजे प्रियंका भाऊसाहेब ---------- २६६

# कृषी विपणन आणि कृषी अर्थशास्त्राचे देशाच्या विकासातील योगदान

डॉ मृणाल रविकांत वलीवकर
असिस्टंट प्रोफेसर
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
कमला नेहरू महाविद्यालय नागपुर, महाराष्ट्र.
Email- mrunal1981waliokar@gmail.com

**प्रस्तावना :**

भारत हा कृषिप्रधान देश आहे कृषी व्यवसाय हा जगातील अत्यंत पुरातन व्यवसाय असून जगातील जवळजवळ दोन तृतीयांश लोकसंख्येचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. भारतात जवळजवळ ५० ते ६० टक्के राष्ट्रीय उत्पन्न शेतीतूनच निर्माण होते वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज, पशुसंवर्धनाकरता आवश्यक असलेले खाद्यपदार्थ, विविध उद्योगांकरीता लागणारा कच्चामाल हा शेती व्यवसायातूनच मिळविला जातो. कोणत्याही देशाच्या विकासात तेथील शेतीच्या प्रगतीला महत्त्वाचे स्थान आहे

देशांमध्ये होणाऱ्या औद्योगिक क्रांती बरोबरच कृषी क्रांतीमुळे आर्थिक प्रगती व स्थैर्य निर्माण होण्यास मदत होते.शेती व्यवसाय भारतातील अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक असून अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. वाढत्या आर्थिक विकासाबरोबरच कृषी वरील लोकसंख्येचे अवलंबित्व कमी होत. देशाच्या विकासाकरिता औद्योगिक विकास होणे आवश्यक आहे व हा विकास कच्चा कच्चा मालावर अवलंबून असतो जो कच्चा माल शेतीपासून प्राप्त होतो. याकरीताच देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये शेतीचे स्थान महत्वपूर्ण आहे. शेतीकडे दुर्लक्ष झाल्यास औद्योगीकरणावर व त्याचबरोबर देशाच्या आर्थिक प्रगतीवर त्याचा परिणाम होतो. औद्योगिक विकासाकरता शेतीचा विकास होणे अनिवार्य आहे. भारताच्या राजकीय उत्पन्नामध्ये कृषी क्षेत्राचे अनन्य साधारण महत्व आहे. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये कृषी क्षेत्रातून राष्ट्रीय उत्पन्नात महत्त्वाची भर पडली होती. देशातील वाढत्या लोकसंख्येमुळे रोजगारांचा तुटवडा निर्माण होत असे. या बेरोजगारीला आळा घालण्यासाठी कृषीक्षेत्राद्वारे तयार होणाऱ्या विविध मालांवर व्यापार व्यवसाय चालविण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुरुवातीला जवळपास ७० टक्के लोक कृषी क्षेत्राशी एकरूप झालेले होते.

शेतीसह अनेक क्षेत्रांवर आज जागतिकरणाचा प्रत्यक्ष परिणाम होताना दिसत आहे. भारताला सुपर पॉवर बनविण्याकरीता शेती हे मोठे प्रमुख अस्त्र मानले जाते. विविध तंत्रज्ञानाचा वाढलेल्या वापरामुळे शेतीचे आधुनिकरण मोठ्या प्रमाणात झालेले दिसत आहे. जपान सारख्या वेगाने विकसित झालेल्या देशांमध्ये सुद्धा शेतीने विकास प्रक्रियेला हातभार लावलेला आहे. आज बदलत्या परिस्थितीनुसार शेतीचे फक्त उदरनिर्वाहाचे असणारे स्वरूप बदलून त्याला व्यापारी स्वरूप देण्यात आले आहे याकरिता कृषी अर्थशास्त्राची नितांत आवश्यकता आहे.

कृषी अर्थशास्त्राची सुरुवात ही विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून झाली असून दुसऱ्या महायुद्धानंतर कृषी अर्थशास्त्राला अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत गेले. भारत हा कृषिप्रधान देश आहे व याकरिता शेतीशी संबंधित सर्व तात्त्विक आणि प्रयोगाधिष्ठित विषयांवर चर्चा होणे आवश्यक असल्यामुळे कृषी अर्थशास्त्र ही एक स्वतंत्र शाखा निर्माण झाली.

टेलर यांच्या मते, कृषी अर्थशास्त्रात जमीन, श्रम, अवजारे इत्यादी साहित्यांची निवड करणे, कोणत्या पिकांची लागवड करायची आहे हे ठरविणे, पशुसंवर्धनाचा उपक्रम ठरविणे आणि शेतीमालाच्या किमती व उत्पादन खर्च यांचा विचार, उत्पादन साधनांच्या प्रमाणांचा प्रश्न सोडविणे या गोष्टींचा अंतर्भाव होतो. ग्रे या शास्त्रज्ञांच्या मते कृषी व्यवसायाच्या विशिष्ट परिस्थितीला अर्थशास्त्राची तत्त्वे आणि पद्धती लागू करणारे शास्त्र म्हणजे कृषी अर्थशास्त्र होय. या व्याख्यावरून आपल्याला असे म्हणता येईल की कृषीच्या व्यवस्थापनाकरता आवश्यक सर्व निर्णयांची शृंखला म्हणजे कृषी अर्थशास्त्र होय. कृषी अर्थशास्त्रामुळे शेतीमध्ये संपत्ती मिळविण्याच्या आणि खर्च करण्याच्या प्रक्रियेमुळे जे संबंध निर्माण होतात. त्यांचा अभ्यास कृषी अर्थशास्त्रात केला जातो. टेलरने कृषी अर्थशास्त्रात व्यवस्थापनाला महत्त्व दिले आहे कृषी अर्थशास्त्र हीच अशी शाखा आहे की ज्यामध्ये कृषीशी संबंधित सुरुवातीपासून तर शेतीमध्ये उत्पादित झालेल्या मालाला बाजारपेठेत योग्य भाव मिळावा याकरिता योग्य बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. तसेच भारतातील शेतकऱ्यांची

ISSN No. 2394-5990

आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरता सर्वतोपरी प्रयत्न कृषी अर्थशास्त्राच्या अभ्यासाद्वारे केल्या जातात.

**कृषी अर्थशास्त्राचे महत्व :**

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषी उत्पन्नाला अनन्य साधारण महत्त्व देण्यात आले आहे भारतातील ४०% लोकांचा रोजगार हा शेती क्षेत्रावर अवलंबून असतो स्वाभाविक कृषी अर्थशास्त्राचे भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान मानले जाते अनेक लहान-मोठे उद्योग व्यवसाय हे शेती क्षेत्रावर अवलंबून असतात. जसे वस्त्रोद्योग, साखर उद्योग, धान्य उद्योग असे अनेक व्यवसाय कृषी क्षेत्रावर आधारलेले आहे. कृषी क्षेत्रातील होणाऱ्या मालाच्या किमतीतील बदलांचा परिणाम इतर बाजारपेठांवर होताना दिसतो. याकरीता देशातील तेजी मंदीच्या व्यापारावर नियंत्रण ठेवण्याकरिता कृषी क्षेत्र महत्त्वाचे आहे. भारत हा कृषी माल निर्यात करणारा प्रमुख देश असून भारताचे अनेक राष्ट्रांसोबत आयात निर्यातीचे व्यापार चालतात. या विदेशी व्यापाऱ्यांद्वारे देशाला परकीय चलन प्राप्त होते. तसेच परदेशातून अवजड यंत्रसामुग्री आवश्यक औद्योगिक कच्चामाल व प्रगत तंत्रज्ञानाच्या सेवा आयात करता येतात. परकीय तंत्रांकडून प्रगत तंत्रज्ञान शिकता येतं व अवजड आणि भांडवली उद्योगांची देशात स्थापना करणे व त्यांचा विकास करणे शक्य होते. भारतातील ७० टक्के जनता आजही ग्रामीण भागात राहते. शेतीमध्ये उत्पन्न झालेल्या शेतमाल बाजारपेठेपर्यंत आणण्याकरिता विविध वाहतुकींच्या साधनांचा उपयोग केला जातो. याद्वारे शेती व्यवसायाबरोबरच कृषी घटकांवर आधारित वाहतूक व दळणवळण क्षेत्राचा विकास होताना दिसतो. देशाच्या आर्थिक वृद्धीकरता कृषी क्षेत्राला अधिक महत्त्व देण्यात आले आहे कृषी क्षेत्राचा देशाच्या अनेक बाबींवर परिणाम होतो जसे आर्थिक भौतिक सामाजिक जीवन विषयक इत्यादी. कृषी अर्थशास्त्र हे केवळ शेती आणि अर्थशास्त्र यांच्याशी संबंधित शास्त्र नसून त्यांचा संबंध समाजशास्त्र, संख्याशास्त्र, गणित, विविध शेतकीशास्त्र इत्यादी शास्त्रांशी येतो बदलत्या काळानुसार कृषी अर्थशास्त्राची व्याप्ती वाढलेली दिसून येते. यामध्ये उत्पादनाचे अर्थशास्त्र, कृषी मालाचे विपणन, कृषी मूल्य आणि धोरण, कृषी पतपुरवठा, जमीन सुधारणा इत्यादी अनेक विभाग समाविष्ट करण्यात आले आहे.

कोणत्याही उद्योग व्यवसायाचे यश त्याच्या उत्पादनांच्या कार्यक्षम बाजारपेठेवर अवलंबून असते. सुरुवातीच्या काळात फक्त उदरनिर्वाह करण्याकरिता शेतीचा उपयोग केला जात असे कोणत्याही प्रकारचा व्यापारी दृष्टिकोन शेतकऱ्यांमध्ये दिसत नव्हता. परंतु ब्रिटिश राजवटीत भारतीय शेतीचे व्यापारीकरण झाले. हळूहळू बाजारपेठेकरिता उत्पादन घेतले जाऊ लागले स्वातंत्र्योत्तर काळात शेतीच्या विकासाकरिता अनेक योजना व कार्यक्रम राबविण्यात आले. शेतीचे उत्पादन आणि उत्पादकता यामध्ये वाढ झाली व १९६६ मध्ये हरितक्रांती घडून आली. शेतीमधील उत्पादनांमध्ये वाढ होऊ लागली. त्याचबरोबर औद्योगीकरण शहरीकरण, दळणवळणाच्या विविध सोयी, शेतीकरिता मिळणारा पतपुरवठा इत्यादी अनेक कारणांमुळे उत्पादनात वाढ होऊ लागली व त्यामुळे शेतीमालाच्या विक्रीसाठी बाजारपेठेची गरज निर्माण झाली. शेतीमालाच्या विक्री व्यवस्थेत शेतकरी ग्राहक आणि दोहोनाही जोडणारे व्यापारी दलाल मध्यस्थ इत्यादी साखळी निर्माण झाली. ज्या ठिकाणी विक्रेते आणि ग्राहक किमती समानीकरणाच्या हेतून एकत्र येतात त्या ठिकाणास बाजार किंवा विपणन असे म्हणतात. कृषी विपणनात उपभोक्ता उत्पादक आणि मध्यस्थ समाविष्ट असतात. भारतातील कृषी विपणन पद्धतीमध्ये शेतकरी वर्ग आणि उपभोक्ता वर्ग असंघटित असल्यामुळे मध्यस्थांना अधिक जास्त त्याचा फायदा होतो . कृषी अर्थशास्त्रात कृषी विपणन हा महत्त्वाचा भाग असून विपणनाची पद्धती, आणि विपनाच्या कार्याची गती यावरच उत्पादक उपभोक्ते यासर्वांचे हित अवलंबून असते. शेतीतील उत्पादित पक्का माल साठवणूक करून ठेवावा लागत असल्यामुळे त्यावर येणारा खर्च तसेच मालावर विकण्याआधी करण्यात येणाऱ्या विविध प्रक्रिया याकरिता येणारा खर्च शेतीमाल विकताना लावला जातो. शेतमाल तयार करण्याची कार्य कमीत कमी खर्चात व जलद गतीने झाली तरच शेतकऱ्यांना उत्पादनात वाढीची प्रेरणा मिळते याकरता कृषी विपणन व्यवस्था कार्यक्षम असावी.

**कृषी मालाच्या विक्री व्यवस्थेचे महत्त्व :**

कृषीमालाच्या योग्य विक्री व्यवस्था ही कृषी उत्पादन प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहे. शेती क्षेत्राचा विकास हा शेतमालाच्या विक्री व्यवस्थेवर अवलंबून असतो. विक्री व्यवस्था ही सुसंघटित व कार्यक्षम असेल तर शेती उत्पादन वाढण्यास प्रेरणा उत्तेजना मिळत असते. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी प्रेरणा देणारी बाजार व्यवस्था असेल तरच शेती मधून अधिक उत्पादन घेतल्या जाऊ शकत. उत्पादित मालाला चांगली व किफायतशीर किंमत मिळाल्यास शेतकरी प्रोत्साहित होऊन देशाच्या औद्योगिक व आर्थिक विकासात हातभार लावला जाऊ शकतो. याकरिता बाजारपेठ उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. चांगल्या बाजार व्यवस्थेमुळे शेतमालाला योग्य किंमत

मिळाल्यामुळे शेतकऱ्यांच्या क्रयशक्तीत वाढ होऊन विविध उद्योगधंद्यांना पोषक वातावरणाची निर्मिती होऊन देशाच्या प्रगतीस मोलाचे योगदान लाभू शकते. योग्य बाजारपेठेच्या उपलब्धतेमुळे शेतमालाच्या किमतीत स्थैर्य लाभू शकतं. सुसंघटित विक्री व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाची योग्य व्यवस्था बाजारपेठेत केल्यामुळे बाजारात एकाच वेळी येणाऱ्या मालामुळे जी घसरण निर्माण होते ती थांबविता येऊन किमतीमध्ये स्थैर्य निर्माण होऊ शकते. याचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो. उत्पादक व उपभोक्ते यांना एकत्रित करण्याच्या हेतूने विपणनाची निर्मिती करण्यात येत असते. विपणन व्यवस्था ही मालाचे एकत्रिकरण प्रतवारी प्रक्रिया मालाची वाहतूक व साठवणूक शेतमालाची विक्री व विमा करण्याच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे. ज्याद्वारे राष्ट्राच्या आर्थिक औद्योगिक विकास जलद गतीने होण्यास मदत होईल. कृषी मालाचे विपणन योग्य होण्यासाठी शेतकऱ्याला शेतमालाचा दर्जा चांगला राखणे आवश्यक आहे. शेतमाल हा प्रथम श्रेणीचा व दर्जेदार असेल तर त्यासाठी विस्तृत बाजारपेठ मिळविणे सुलभ जाते. प्रत्येक शेतकऱ्याला बाजारपेठेविषयक योग्य माहिती असणे आवश्यक आहे. तसेच शेतकऱ्यांची प्रतीक्षा क्षमता वाढविणे आवश्यक आहे. शेतमाल सुरक्षित रहावा याकरिता बाजारपेठेत गोदामांची व्यवस्था अल्प दरात पुरेशा प्रमाणात व शेतकऱ्याला जवळ पडेल अशा ठिकाणी उपलब्ध करून द्यावी. शेतकऱ्यांची मध्यस्था कडून कोणतीही फसवणूक होणार नाही. याकरिता शेतमाल विक्री व्यवस्थेत दलाल व व्यापारी यामध्ये असलेली साखळी कमी झाली पाहिजे. शेतकरी संघटित असल्यास विपणन व्यवस्था चांगली होण्यास मदत होईल. ज्यामुळे देशाच्या आर्थिक दृष्ट्या सुदृढ वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. कृषी मालाच्या विपणन व्यवस्थेतील दोषांमुळे शेतमालांवर झालेल्या विपरीत परिणामांचा प्रभाव कच्च्या मालाच्या उत्पादनावर देखील होताना दिसतो, हे दोष दूर करण्याकरिता सहकारी विक्री व्यवस्था सुरू करण्यात आली. या द्वारे स्थापित झालेल्या संस्था शेतमालाच्या पुरवठ्यावर योग्य नियंत्रण ठेवून शेतमालाला योग्य भाव मिळवून देऊ शकतात. शेतमालाची प्रतवारी प्रमाणिकरण, वजन मापे प्रमाणित असल्याची खात्री केली जाते. सहकारी विक्री व्यवस्थेमुळे शेतकऱ्याला शेतमालाच्या तारणावर कर्ज सुविधा व शेतमालाच्या वाहतुकीसाठी योग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. या सर्व सुविधांमुळे शेतकऱ्यांची प्रतीक्षा क्षमता वाढून शेतमालाला योग्य किंमत प्राप्त होते. यामुळे बाजारातील गैरप्रकारांना आळा बसतो. सहकारी खरेदी विक्री संस्थेची रचना प्रत्येक राज्यानुसार वेगवेगळी असून प्राथमिक सहकारी खरेदी विक्री संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी खरेदी विक्री संस्था राज्य सहकारी खरेदी विक्री संस्था व राष्ट्रीय पातळीवर खरेदी विक्री संस्था अशा विविध पातळीवर शेतमालाचे सहकारी तत्त्वावर खरेदी विक्री केल्या जाते.

सहकारी खरेदी विक्री संस्थांमुळे शेतमालाला योग्य किंमत मिळते दलाल व मध्यस्थांद्वारे होणारे शेतकऱ्यांचे शोषण थांबविण्याकरिता मदत होते. शेतकऱ्यांना सुलभरीत्या पतपुरवठा केल्या जातो. ज्यामुळे शेतमालांची विक्री केल्या जाते. शेतमालाला योग्य भाव मिळाल्याने शेतकरी सुखावतो, सहकारी संस्थांमुळे शेतकरी आपल्या मालाचा सामुदायिक सौदा करून चांगले भाव मिळवू शकतात. सहकारी खरेदी विक्री संस्थाद्वारे शेतमालाचे वर्गीकरण व प्रतवारी केल्या जाते, त्यामुळे मालाला चांगला दर प्राप्त होतो. याकरिता शेतकरी अधिक शेती उत्पन्न मिळविण्याकरिता व मालाचा दर्जा सुधारण्याकरिता प्रेरित होतात.

शेतकर्यांची उत्पादन प्रेरणा वाढविण्यासाठी आणि शेती क्षेत्राच्या विकासासाठी सुसंघटित व नियंत्रित बाजारपेठांत पेठांची आवशक्यता आहे. यासाठी सरकारने नियंत्रित बाजारपेठेची स्थापना केली ज्याद्वारे शेतकरी दलाल स्थानिक स्वराज्य संस्था व सरकार यांच्या प्रतिनिधींची एक समिती स्थापन करून त्याद्वारे शेतमालाच्या व्यवहाराबाबत चे नियम तयार करून त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते.

नियंत्रित बाजारपेठेमुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या फसवणुकीला आळा घातला जातो. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य व वाजवी किंमत मिळते यामुळे त्यांना उत्पादन प्रेरणा मिळते पर्यायाने शेतकरी चांगल्या प्रतीचे उत्पादन घेतो ज्यामुळे राष्ट्राचा आर्थिक विकास होण्यास हातभार लागतो.

निष्कर्ष :

देशाची आर्थिक प्रगती होण्याकरिता औद्योगिक विकास आवश्यक आहे. याकरिता आवश्यक कच्चा मालाचा पुरवठा होण्याकरिता शेतीचा विकास होणे अपरिहार्य आहे. शेतीचा विकास तेव्हाच होईल जेव्हा शेतकरी प्रेरित होऊन शेती उत्पादन करतील याकरिता विपणनाच्या योग्य पद्धती महत्त्वपूर्ण ठरतात. म्हणजेच देशाच्या आर्थिक प्रगतीमध्ये शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे. शेतीकडे दुर्लक्ष केल्यास औद्योगिकरणाच्या विकासावर मर्यादा येतील. शेती उत्पादनाची उत्पादन क्षमता वाढविण्यास कारखान्यांची मदत होते यावरूनच असे म्हणता येईल की शेती व औद्योगिक क्षेत्र हे परस्परावलंबी असून याद्वारे देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे योगदान दिल्या जाते.

ISSN No. 2394-5990

संदर्भ :

१) Agricultural Economics- R.K. Lekhi Joginder Singh Kalyani Publisher New Delhi 2006.
२) Agricultural Growth in India- Anil Kumar Kaushal RSBA Publisher Jaipur 2015.
३) Agricultural Economics R. S. Desai Himalaya Publishing house.
४) भारतीय अर्थव्यवस्था प्राध्यापक राय खेडकर डॉ. दामजी, विद्या बुक्स पब्लिकेशन औरंगाबाद
५) कृषी अर्थशास्त्र डॉ. वसुधा पुरोहित खांदेवाले विद्या बुक पब्लिशर्स औरंगाबाद
६) भारताचे कृषी अर्थशास्त्र प्रा. डॉ. मुकुंद गायकवाड कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयानगर पुणे
७) कृषी अर्थशास्त्र पिके गुप्ता वृंदा पब्लिकेशन प्रायव्हेट लिमिटेड २०१२

■■■



6